झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनीः ०२२-२६५९०५९९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in

जा.क्र.मुंबई/मुकाअ/परिपत्रक/सन २००८/149/मशा
दिनांक : 27/०२/२००८ 2008

परिपत्रक क्रमांक : ---- 89

# -: परिपत्रक :-

विषय : <u>संस्थेच्या पुनर्वसन इमारतीतील सदनिकांचे सोडत (लॉटरी)बाबत.</u>

झोपडपटटी पुनर्वसन योजनेतील संस्थेच्या पुनर्वसन इमारतीत उपलब्ध असलेल्या निवासी, निवासी/अनिवासी (उपलब्ध असल्यास) सदनिकांचे वाटप प्राधिकरणातील सहकार कक्षाचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत सोडतीने व्हिडीओ चित्रीकरणात करण्यात यावे. सदनिकांचे वाटप बाबत कार्यवाही करतांना प्राधिकरणाकडून यापूर्वी निर्गमित केलेले परिपत्रक क्रमांक ५५ व ७१ या मध्ये या परिपत्रकानूसार सुधारणा लक्षात घेवून खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

१. सदनिकांचे वाटपास परवानगी घेतांना संस्था/विकासक यांचेकडून संस्थेचे अध्यक्ष,सचिव व योजनेचे विकासक यांचे स्वाक्षरीनिशी पात्र झोपडीधारकांची फोटो यादी, मंजूर परिशिष्ट-२ ची झेरॉक्स प्रत, इमारतीचा नकाशाची प्रत इत्यादिसह सादर करणे आवश्यक राहील.

२. परिशिष्ट-२ ची जोडपत्रासह मंजूर प्रत उपजिल्हाधिकारी शाखेने (पुरवणी परिशिष्टासह) सहकार कक्षास दयावी.

. सदनिकांचे सोडतीची व्यवस्था संस्था/विकासक यांनी करावी.

. सोडत पद्दतीने सदनिकांचे वितरण करतांना व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे, व्हिडीओ चित्रीकरणाचा खर्च संस्था/विकासक यांनी करावा.

सोडतीने सदनिकांचे वितरण करतांना अंध, अपंग, विधवा महिला कुंटुबप्रमुख असलेली कुंटुबे, यांना प्राधान्य म्हणून त्यांची स्वत:ची विनंती असल्यास खालच्या माळयावरील सदनिकांचे सोडतीने वितरण करण्यात येईल.

सोडतीने सदनिकांचे वितरण करतांना जे पात्र झोपडीधारक उपस्थित आहेत त्यांना सोडतीने वाटप केल्यानंतर जे पात्र झोपडीधारक उपस्थित झाले नाहीत त्यांच्या सदनिकांचे वाटप उपस्थित असलेले संस्था/विकासक प्रतिनिधी यांचे उपस्थितीत करणेत येईल व त्यानूसार उर्वरीत चिठ्ठयांचे क्रमांक त्यांचे नावाचे समोर दर्शविण्यात येईल. त्यामुळे अनुपस्थित झोपडीधारकानांही त्याच दिवशी सदनिकांचे वाटप झाल्याचे गृहीत धरण्यात येईल.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनीः ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in

७. सदनिकांची चिठ्ठी काढतांना पात्र झोपडीधारक काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत तर त्यांनी त्यांचे पती/पत्नी, मुलगा, मुलगी यांना सदनिकांची सोडतीने चिठ्ठी काढण्यास परवानगी देणेत येत आहे, परंतु सदनिकेची चाबी व ताबा घेतांना पात्र झोपडीधारक स्वत: उपस्थित राहणे आवश्यक राहील.

८. अभियांत्रिकी विभागाने इमारतीला ताबा पत्र (Occupation Certificate) सहकार कक्षाने वाटप प्रमाणपत्र दिल्यानंतरच दयावे.

९. Occupation Certificate दिल्यानंतर मंजूर वाटप प्रमाणपत्राप्रमाणे सदनिकेचा ताबा (Possession) व ताबा पत्र (Possession letter) संस्था/विकासकाने पात्र झोपडीधारकांना दयावे.

वरील निर्देशाचे अवलंब सदनिकांचे वितरण बाबत कार्यवाही करतांना आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.